नि.फौ.ख.क्र.३८२/२०२०
शासन–वि– रितेश वानखेडे
नि.क्र. ०६

मी शपथेवर खरे सांगते की,

माझे नांव – कू. महिमा कैलासचंद्र साठे
वय अंदाजे २५ वर्ष, कामधंदा– शिक्षण
राहणार– समतानगर, सावंगी मेघे, वर्धा, तह. व जि. वर्धा.

.........................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी– सरकारी वकील श्रीमती आर.आर.होनमाने यांच्या मार्फत.**

१. घटना दि. २२.०८.२०१९ रोजी जे.बी. सायन्स कॉलेज येथे वाहन तळावर घडली होती. त्यावेळी मी जे. बी. सॉयन्स कॉलेज येथे बी.ए. प्रथम वर्षाला शिकत होती. त्यादिवशी, मी सकाळी ०९.३० वाजता शाळेत गेली होती व कॉलेज संपल्यानंतर, दुपारी ३.३० वाजता गाडी घेण्याकरीता वाहन तळावर गेली त्यावेळी तेथे रितेश वानखेडे उभा असलेला मी बघीतला, तो माझे गाडीजवळ उभा होता. मी तेथे गाडी काढण्यासाठी गेली. त्यावेळी आरोपीने माझी बँग व मोबाईल फोन हिसकावला. माझा फोन आरोपीने परत केला, परंतु त्याने माझेसोबत जबरदस्तीने सेल्फी काढली. सदरची सेल्फी आरोपीने त्याचे मोबाईलमध्ये काढली होती. त्याला शेल्फी काढण्याबाबत विचारले असता, त्याने माझे गालावर दोन थापडा मारल्या व याबाबत कोणाला सांगितल्यास, जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर, माझे आत्याला सदर घटना सांगितली. त्यानंतर मी व माझी आत्या रिपोर्ट देण्यास पोलीस स्टेशनला गेली. आता मला दाखविण्यात आलेला रिपोर्ट तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास P1/PW1 देण्यात येते. आता मला दाखविण्यात आलेला छापील प्रथम खबर तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास P2/PW1 देण्यात येते. छापील प्रथम खबर दिल्यानंतर पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. यापूर्वी मी न्यायालयात बयाण देणेसाठी आली होती. फिर्यादीचे फौ.प्र.संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेल्या बयाणाचा लिफाफा उघण्यात आला. आता मला दाखविण्यात आलेल्या पॉकीटातील बयाण माझेच आहे, त्यावर माझी सही आहे. त्यास P3/PW1 देण्यात येते. आरोपी रितेश आज

न्यायालयात हजर आहे. त्यास मी ओळखते. घटनेपूर्वी, मी इयता ९ वी मध्ये शिकत असतांनाही आरोपी मला मागे येवून त्रास देत होता. त्यावेळी, मी माझ्या आत्याला सदर बाब सांगितली होती, त्यावेळी तिने आरोपीला रागावले होते. त्यामुळे त्याचे मनात राग होता.

**आरोपीचे वकील गैरहजर, आरोपीस साक्षीदाराचा उलटतपास घ्यावयाचा नाही. उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीक्रुती

MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.06.22 16:35:03 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक २२–०६–२०२६

माझे समक्ष

MRUNAL YASHWANT DOIPHODE
Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.06.22 16:34:58 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक २२–०६–२०२६